# सरिता गाखरे यांच्या विदर्भ आणि मराठवाडा भागातील लोकसभा निवडणूक विषयक कार्याचे : ऐतिहासिक सिंहावलोकन

**डॉ. तिर्थनंद बन्नगरे**
सहयोगी प्राध्यापक
स्व. वसंतराव कोल्हटकर महाविद्यालय,
रोहणा

---

***सारांश :***

*भारतीय संविधानाने देशातील सर्व स्त्री आणि पुरूषांना समान राजकीय आणि नागरी हक्क प्रदान केलेले आहे. घटनेच्या कलम ३२४ आणि ३२६ प्रमाणे महिलांना मतदान करण्याचा आणि निवडणूक लढविण्याचा राजकीय अधिकार प्राप्त झाला. इ.स. १९५१ च्या पहिल्या ते इ.स. २०२४ च्या अठराव्या लोकसभा निवडणूकीपर्यंत विचार केला असता, स्त्रीयांचा राजकीय वावर निश्चितच वाढलेला दिसतो. नागरी भागाचे तुलनेत ग्रामीण भागातील महिलाही राजकारणात हिरीरीने आगेकूच करीत आहे. त्यामध्ये नागपूर जिल्हयाच्या काटोल तालुक्यातील कोल्हू गावच्या हनुमंतराव देशमुख यांची कन्या सरिता धर्तीमुर्ती गावचे श्रीमंत मनोहरराव राघोबाजी गाखरे (महाजन) यांचे चिरंजीव विजय मनोहर गाखरे यांचेशी २२ मे २००३ ला विवाहबध्द झाल्या. लगेच चौदा वर्षानंतर वर्धा जिल्हयातील कन्नमवार ग्राम जिल्हा परिषद सर्कल मधून ६३२२ मतांनी प्रतिस्पर्धी वर मात करीत जिल्हा परिषद निवडणूकीत विजयी झाल्या. पुढे तीन वर्षानंतर ६ जानेवारी २०२० रोजी वर्धा जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष पदावर विराजमान झाल्या. कालांतराने एप्रिल २०२३ मध्ये सरिता गाखरे भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश सचिव बनल्या. त्यांनी इ.स. २०२४ च्या लोकसभा निवडणूकीत पक्षाचे वतीने विदर्भ आणि मराठवाडा भागात मोलाचे निवडणूक विषयक राजकीय कार्य केले. त्या कार्याची विस्तृत मांडणी या शोधनिबंधातून मी केलेली आहे.*

**बिजसंख्या :**

या शोधनिबंधामध्ये सरिता गाखरे यांचे विदर्भ आणि मराठवाडा भागातील लोकसभा निवडणूक विषयक कार्य किती महत्वपूर्ण आहे त्याची मांडणी करण्यात येत आहे.

---

**शोधनिबंधाची उद्दीष्टये (Objective of Research paper) :**

१. केसरीमल कन्या शाळेच्या मैदानावर सभा

२. वर्धा येथील नियोजन मेळाव्याला उपस्थिती

३. अमरावती येथे जिल्हा कार्यकारणीची बैठक

४. धामणगाव येथील महाजन संपर्क अभियानाला उपस्थिती

५. बुथशक्ती वॉरीयर्सची बैठक

६. वर्धा येथे महायुती पदाधिकारी मेळावा

७. दिल्ली येथे भाजपा राष्ट्रीय अधिवेशनाला उपस्थिती

८. आर्वी येथे लोकसभा निवडणूक प्रचार कार्यालयाचे उद्घाटन

९. पंतप्रधान नरेंन्द्र मोदी यांच्या प्रचार स्थळाचे भूमीपुजन

१०. रामदास तडस यांचा उमेदवारी अर्ज दाखल

११. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा सन्मान

१२. रामदास तडस यांचे प्रचारार्थ आर्वीत सभा

१३. धर्ती येथील केन्द्रावर मतदान

१४. लोकसभा उमेदवाराकरीता हिंगणघाट मध्ये सभा

१५. अतोरा येथे प्रचार सभा

१६. निवडणूक प्रचारार्थ लातूरला रवाना

**गृहितके (Hypothesis) :**

विदर्भ आणि मराठवाडा लोकसभा निवडणूक विषयक कार्याची शोध निबंधातून विस्तृत मांडणी करणार आहे.

**कालावधी (Period) :**

या शोध निबंधाचा कालावधी इ.स. २०२३ ते २०२४ पर्यंतचा आहे.

**संशोधन पध्दत (Research of Methodology) :**

प्रस्तृत शोध निबंधाकरीता प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा आधार घेण्यात येणार आहे. विविध संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, मासीके, वृत्तपत्रे, विविध जिल्हयांचे गॅझेट, स्मरणीका, दौरा डायरी, मुलाखत या साधनांचे आधारे हा शोधनिबंध पुर्ण करण्यात येणार आहे.

**प्रस्तावना :**

**सरिता गाखरे केसरीमल कन्या शाळेच्या मैदानावर :**

पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांच्या दुसऱ्या कारकिर्दीतील विकास कार्याबद्दल जनतेला माहिती देण्याकरीता सभेचे आयोजन करण्यात आले. ही सभा वर्धा शहरातील केसरीमल कन्या शाळेच्या मैदानावर आयोजित करण्यात आली. सभेत केन्द्र सरकारच्या विकासात्मक कार्याची माहिती केन्द्रीय माहिती प्रसारण युवा कार्यक्रम व क्रिडा मंत्री अनुराग ठाकूर यांनी दिली. या

सभेत वर्धा जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष सरिता गाखरे यांनी हजारोच्या संख्येने उपस्थित जनसमुदायाला मार्गदर्शन केले. यावेळी संघटनमंत्री उपेन्द्र कोठेकर, वर्धा लोकसभा संपर्क प्रमुख सुमीत वानखडे आमदार दादाराव केचे, रामदास तडस यांची उपस्थिती होती.

**सरिता गाखरेंच्या उपस्थितीत जिल्हा कार्यकारीणीची बैठक :**

विदर्भातील पश्चिम विदर्भात असलेल्या अमरावती येथे ४ जानेवारी २०२४ ला भारतीय जनता पक्षाच्या जिल्हा कार्यकारीणीची बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीत प्रत्यक्ष नागरिकांमध्ये जावून नवमतदारांची जास्तीत जास्त नोंदणी करण्याविषयीचे मार्गदर्शन सरिता गाखरे यांनी केले. बैठकीला अमरावती भाजपा जिल्हाध्यक्ष डॉ. अनिल बोंडे, शिवरॉय कुळकर्णी, दिनेश सुर्यवंशी, जयंत डेहनकर यांचेसह मोठया संख्येने भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीचे प्रास्ताविक डॉ. अनिल बोंडे, संचालन विलास काविटकर तर आभार नितीन गुडधे यांनी मानले.

**महाजन संपर्क अभियानाला सरिता गाखरे यांची उपस्थिती :**

भारतीय जनता पक्षाचे महाअभियान २ नोव्हेंबर २०२३ रोजी अमरावती जिल्हयातील धामणगांव येथे भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावणकुळे यांचे उपस्थितीत सुरू झाले. या महाअभियानाला वर्धेचे खासदार रामदास तडस, खासदार डॉ. अनिल बोंडे, प्रदेश भाजपा सचिव सरिता गाखरे, सुमीत वानखडे, सुधीर दिवे, आमदार प्रताप अडसड यांची प्रमुख उपस्थिती राहीली.

**बुथशक्ती वॉरियर्सची बैठक :**

लोकसभा निवडणुकीपूर्वी आर्वी येथे बुथशक्ती वॉरियर्सची बैठक सरिता गाखरे यांचे उपस्थितीत पार पडली. त्यानंतर काजळी, गवंडी, सिंदीविहीरी, कन्नमवार ग्राम, हेटीकुंडी, ठाणेगांव, सेलगांव (उमाटे), बांगडापूर या कन्नमवार ग्राम जिल्हा परिषद सर्कल मधील गावामधील मतदारांचे निवडणूक विषयक मत जाणून घेतले. यावेळेस कारंजा घाडगे तालुका भाजपा प्रमुख चक्रधर डोंगरे, जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या रेवता धोटे, भाजपा, शिवसेना, राका (अजीत गट) रिपाई (आठवले) गटाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

**वर्धा येथे महायुती पदाधिकारी मेळावा :**

महायुतीमधील भारतीय जनता पक्ष, शिवसेना (शिंदे गट), आरपीआय या पक्षाचे कार्यकर्त्यांचा मेळावा १४ जानेवारी २०२४ रोजी वर्धा येथील हेरिटेज सभागृहात संपन्न झाला. मेळाव्याच्या प्रमुख अतिथीपदी सरिता गाखरे, तर अध्यक्षस्थानी वर्धेचे खासदार रामदास तडस होते. मेळाव्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारच्या कल्याणकारी योजना लोकांपर्यंत पोहोचविण्याच्या सुचना उपस्थित कार्यकर्त्यांना सरिता गाखरे यांनी दिल्या. मेळाव्याचे प्रास्ताविक सुनिल गफाट तर आभार गणेश इखार यांनी मानले.

**दिल्ली येथील राष्ट्रीय अधिवेशन :**

लोकसभा निवडणुकीपुर्वी भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अधिवेशन १७ फेब्रुवारी २०२४

रोजी भारत मंडपम सभागृह दिल्ली येथे भरले. या अधिवेशनाला देशाच्या कानाकोपऱ्यातून अकरा हजार प्रतिनिधींची उपस्थिती राहीली. त्यामध्ये पक्षाचे जेष्ठ नेते व पुर्व मानव संसाधनमंत्री डॉ. मुरली मनोहर जोशी, राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा, पंतप्रधान नरेन्द्र मोदी हे व्यासपीठावर उपस्थित होते. राष्ट्रीय कार्यकारीणीचे सर्व पदाधिकारी अनेक राज्यांचे भाजपा मुख्यमंत्री, मंत्री, आमदार, महाराष्ट्र राज्याच्या भाजपा सरचिटणीस व पुर्व वर्धा जिल्हा परिषद अध्यक्ष सरिता गाखरे यांची सभामंडपामध्ये प्रमुख उपस्थिती होती. स्थानिक पातळीवरचे अनेक नेते भगवी टोपी आणि गळयात शेला टाकून सहभागी झाले. महाराष्ट्राच्या गाव चलो अभियान प्रमुख म्हणून सरिता गाखरे यांनीही आपले राज्यातील प्रेझेन्टेशनची तयारी पुर्ण करून ठेवली होती.

**लोकसभा निवडणूक कार्यालयाचे उद्घाटन :**

महायुतीचे लोकसभा उमेदवार रामदास तडस यांना भर भक्कम मताने निवडून देण्याचा आर्वीकरांनी यावेळी निर्णय घेतला. त्याकरीता पद्मावती चौकामध्ये पक्षाचे लोकसभा कार्यालयाचे उद्घाटन २२ मार्च २०२४ रोजी झाले. उद्घाटन समारंभाला उमेदवार रामदास तडस यांचे सोबत सरिता गाखरे उपस्थित होत्या.

**रामदास तडस यांचा उमेदवारी अर्ज दाखल :**

वर्धा लोकसभेतील महायुतीचे उमेदवार म्हणून रामदास तडस यांनी वर्धेचे जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये ३ एप्रिल २०२४ रोजी अर्ज दाखल केला. यावेळी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस, भाजपा प्रदेश सचिव सरिता गाखरे यांची प्रमुख उपस्थिती होती. लगेच स्वाध्याय मंदीरातून निघालेल्या मिरवणूकीचे ठिकठिकाणी शहरातील व्यापाऱ्यांनी स्वागत केले. वर्धा शहराच्या मुख्य मार्गानी फिरून साई मंगल कार्यालयामध्ये सभा झाली. या सभेवेळी सेलू, वर्धा, चांदूर, आष्टी, आर्वी, कारंजा (घाडगे) विधानसभा मतदार संघातील लोक मोठया संख्येने उपस्थित होते.

**प्रचार सभा स्थळाचे पुजन :**

वर्धा लोकसभा महायुतीचे उमेदवार रामदास तडस आणि अमरावती लोकसभेच्या उमेदवार नवनीत राणा यांचे प्रचाराकरीता तळेगाव येथील चेतना ग्राऊंड हे ठिकाण निश्चित करण्यात आले. ही प्रचारसभा १९ एप्रिल २०२४ रोजी होणार होती. या प्रचार सभा स्थळाचे पुजन सरिता गाखरे यांनी १५ एप्रिल २०२४ रोजी केले. यावेळेस विदर्भ संघटन मंत्री उपेन्द्र कोठेकर, खासदार रामदास तडस, आमदार दादाराव केचे उपस्थित होते.

**पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांचा सरिता गाखरे यांचेकडून सन्मान :**

वर्धा लोकसभा क्षेत्राचे भाजपा उमेदवार रामदास तडस आणि अमरावती लोकसभा क्षेत्राच्या उमेदवार नवनीत राणा (पवार) यांचे प्रचारार्थ १९ एप्रिल २०२४ रोजी तळेगांव (शा. पंत) येथील चेतना ग्राऊंडवर प्रचार सभा आयोजित करण्यात आली. सभेला देशाचे माननिय पंतप्रधान नरेन्द्रजी मोदी यांनी सभेला संबोधित केले. सभेला महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावणकुळे, खासदार अनिल बोंडे, माजी केन्द्रीय मंत्री

सुबोध मोहीते, सरिता गाखरे यांची विशेष उपस्थिती होती. या सभेच्या व्यासपीठावर सरिता गाखरे यांनी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांना विठ्ठल रूख्मीणीची मुर्ती देवून सन्मान केला.

**रामदास तडस यांचे प्राचारार्थ आर्वीतील सभेला मार्गदर्शन :**

महायुतीचे लोकसभा उमेदवार रामदास तडस यांचे प्रचारार्थ गांधी चौक आर्वी येथे २१ एप्रिल २०२४ रोजी सभेचे आयोजन करयात आले. या सभेच्या प्रचाराला राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित होते. या सभेला व्यासपीठाहून महाराष्ट्र प्रदेश सचिव सरिता गाखरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. जास्तीत जास्त मतांनी उमेदवार रामदास तडस यांना निवडून आणण्याची विनंती प्रचारातून केली. सभेला माजी केन्द्रीय मंत्री सुबोध मोहीते, सुधीर दिवे, आर्वीचे माजी नगराध्यक्ष प्रशांत सव्वालाखे उपस्थित होते.

**सरिता गाखरे यांचे धर्ती येथील केंद्रावर मतदान :**

लोकसभा प्रचार यंत्रणा संथ झाल्यावरही सरिता गाखरे यांनी घरावर तुळशीपत्र ठेवून स्वत:ला प्रचारामध्ये वाहून घेतले. सारख्या आपल्या कन्नमवार ग्राम जिल्हा परिषद सर्कलमध्ये प्रचाराकरीता वणवण फिरत राहील्या. दुसरे दिवशी सकाळी २८ एप्रिल २०२४ या मतदानदिनी सकाळी ७.०० वाजता धर्ती या स्वगावच्या ग्रामपंचायत मतदान केन्द्रावर जावून मतदानाचा हक्क बजावला.

त्यानंतर लगेच स्वत:चे कन्नमवार ग्राम जिल्हा परिषद सर्कल मधील एकेका गावच्या मतदान केन्द्रावर जावून मतदारांच्या भेटी घेतल्या. नजीकच्या दाभा गावचे बुथ केन्द्रावर स्वत: बसून मतदार यादीतून मतदारांची नावे शोधणे, त्यांना टोकन (चिठ्ठी) देणे, वेळेपूर्वी मतदान पुर्ण व्हावे याकरीता स्वत:चे वाहनातून मतदारांना मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी आणले.

**सरिता गाखरे लोकसभा प्रचारार्थ हिंगणघाट मध्ये :**

महायुतीचे उमेदवार खासदार रामदास तडस यांचे निवडणूक प्रचाराकरीता उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदीत्यनाथ आले. या प्रचार सभेला त्यांचेसोबत प्रदेश सचिव सरिता गाखरे होत्या. त्यांनीही उपस्थित मतदारांना रामदास तडस यांना जास्तीत जास्त मतांनी निवडून आणण्याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी धामणगावचे आमदार प्रताप अडसड, हिंगणघाटचे आमदार समीर कुणावार, रामदास तडस उपस्थित होते. सभेचे संचालन किशोर दिघे, तर आभार आकाश पोहणे यांनी मानले.

**सरिता गाखरे यांची अंतोरा येथे प्रचारसभा :**

वर्धा लोकसभा उमेदवार रामदास तडस यांचे प्रचारार्थ सरिता गाखरे यांनी ग्राम अंतोरा येथे सभेचे आयोजन केले. त्यांचे उपस्थितीत झालेल्या या प्रचार सभेला आमदार दादाराव केचे, उमेदवार रामदास तडस उपस्थित होते. यावेळी सरिता गाखरे यांनी रामदास तडस यांना परिसराचे विकासाकरीता निवडून देण्याची उपस्थित मतदारांना विनंती केली.

**निवडणूक प्रचारार्थ सरिता गाखरे लातूरला रवाना :**

भारतीय जनता पक्षाने लातूर लोकसभा क्षेत्रांतर्गत येणाऱ्या लोहा विधानसभा क्षेत्रातील

गावांमध्ये निवडणूकीकरीता निरीक्षक म्हणून सरिता गाखरे यांची नेमणूक झाली. त्यांचे कामातील सातत्य व अनुभव पाहता त्या लगेच तिसऱ्या टप्प्यात होणाऱ्या लोकसभा निवडणूकीच्या प्रचारार्थ लातूरला रवाना झाल्या.

**सरिता गाखरे यांना नरेन्द्र मोदी यांच्या शपथविधी समारंभाचे निमंत्रण :**

माननीय नरेन्द्र मोदी यांनी देशाच्या पंतप्रधानपदी तिसऱ्यांदा शपथ घेण्याकरीता शपथग्रहण समारंभाचे दिल्ली येथे ९ जुन २०२४ रोजी आयोजन केले. त्या शपथग्रहण समारंभासाठी वर्धा जिल्हयातून एकूण अकरा जणांना निमंत्रीत करण्यात आले. त्यामध्ये सरिता गाखरे सुध्दा होत्या. या अकरा लोकांपैकी काही शपथग्रहण समारंभासाठी दिल्लीला गेले. तर काहींनी वर्धा आणि आर्वी येथे राहून गुलाल उधळून जल्लोष साजरा केला.

**सरिता गाखरे यांचा आर्वीमध्ये जल्लोष :**

देशाच्या पंतप्रधान पदावर तिसऱ्यांदा विराजमान होण्याकरीता ९ जुन २०२४ ला दिल्ली येथे शपथग्रहण समारंभ आयोजित करण्यात आला. यावेळी सरिता गाखरे दिल्लीला न जाता आर्वी येथील विश्रामगृह परिसरात थेट प्रक्षेपण वेळी उपस्थित होत्या. यावेळी भाजपा कार्यकर्त्यांचा अफाट जनसागर होता. या सर्व कार्यकर्त्यांनी पंतप्रधानपदाची नरेन्द्रजी मोदी आणि त्यांचे केन्द्रीय मंत्र्यांनी शपथ घेतल्यानंतर दिल्लीतील स्क्रीनवरील दृश्य पाहून ढोलताशांच्या गजरात आणि फटाक्याच्या आतिषबाजीत सरिता गाखरे यांचे नेतृत्वात जल्लोष साजरा केला. संपूर्ण कार्यकर्ते गुलाल उधळीत आर्वीचे शिवाजी चौकात आले व त्यांनी जल्लोशात सामील प्रत्येक व्यक्तीला लाडूचे वाटप केले.

**निष्कर्ष :**

इ.स. २०२४ च्या लोकसभा निवडणूकीत भाजपाला देशात सर्वाधिक मते प्राप्त झाली. त्यामुळे देशाच्या पंतप्रधानपदी नरेन्द्रजी मोदी यांना सरकार बनविण्याकरीता देशाच्या महामहीम राष्ट्रपती द्रौपती मुर्मु यांनी निमंत्रीत केली. अखेर निमंत्रण मिळताच प्रधानमंत्री पदासाठी मा. नरेन्द्र मोदी यांनी दावा केला. लगेच झालेल्या शपथग्रहण समारंभात आपल्या मंत्र्यासह प्रधानमंत्री पदाची शपथ घेतली. या शपथग्रहण समारंभाचे वर्धा जिल्हयातील अकरा लोकांना निमंत्रण होते. त्यामध्ये सरिता गाखरे एक होत्या. त्या या शपथग्रहण समारंभाला न जाता आर्वी येथील विश्रामगृह येथे एल.सी.डी. लावून तो अद्‌भुत शपथग्रहण सोहळा त्यांनी अनुभवला. लगेच आर्वी शहरात ढोल ताशाच्या गजरात गुलाल उधळत भव्य मिरवणूक सरिता गाखरे यांनी आपले पक्षाचे कार्यकर्त्या समवेत काढली.

**संदर्भ सूची :**


- दैनिक तरूणभारत १५/१/२०२४
- दैनिक तरूण भातर २३/३/२०२४
- तरूण भारत १८/२/२०२४
- तरूण भारत १/५/२०२४

- हितवाद, सकाळ, लोकमत, महासागर ४/६/२०२४
- नवभारत, लोकसत्ता १६/४/२०२४
- दै. देशोन्नती, लोकमत, महासागर ३०/४/२०२४
- दैनिक भास्कर ९/४/२०२४
- तरूण भारत ७/६/२०२४
- तरूण भारत १/४/२०२४
- हितवाद ३/११/२०२३
- तरूण भारत ५/१/२०२४
- युवाराष्ट्र २३/४/२०२४
- महासागर २८/४/२०२४
- दै. सकाळ, महासागर, युवाराष्ट्र, हितवाद, नवभारत २०/४/२०२४